# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 13/01/2020 (सोमवार)
# (सायंकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :— पो.स्टे. सावनेर दिनांक 16/06/2017 चे 00.19 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो. स्टे. सावनेर येथे अप. क्र. 229/2017 कलम 376(2)(आय)(एन), 506 भादवी सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 14/06/2017 चे 2 महिण्यापुर्वीपासून आरोपी नामे— 1) संग्रामसिंग डिलु रोंडगे, वय 26 वर्ष, रा. सर्वोदय नगर, सावनेर याने फिर्यादींच्या मोठया मुलीस खाऊ घेवून देतो, या बहण्याने 11 वर्षीय पिडीत लहान मुलीला स्वतःच्या घरी नेऊन अश्लिील कृत्य केले. तसेच आरोपीने मागील 2 महिण्यापासुन पीडित लहान मुलीला खाऊ घेवून देण्याच्या बाहण्याने स्वतःच्या घरी किंवा संडासाच्या मागे झाडाझुडपात नेऊन तिच्या सोबत वारंवार संभोग केले तिने नाही म्हटले असता नालीत फेकुन देण्याची धमकी देत होता. आरोपीला दिनांक 16/06/2017 चे 02.30 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती मृणाली वंजारी, पो.स्टे. सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक 13/01/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री के. जी. राठी, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 354 अ (1) (आय) भादंवि मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 5,00/—रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी कैद सहकलम 7, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 3 वर्ष सश्रम कारावास व 5,00/—रु. दंड व दंड न भरल्यास 1 महीना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. मोटघरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. अरूण भुरे, श्री. प्रमोद पाटील, पोहवा श्री. शेखर मेश्राम, पोना महेंद्र सहारे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर